दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार २६ जानेवारी २०२५ | अंक४८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

# संतोष देशमुखांसाठी मुंबईत आक्रोश; बहिणीचे अश्रू अनावर !

## मुंबई मेट्रो सिनेमा ते आझाद मैदान मोर्चा;प्रियांका चौधरी यांचा मोर्चात सहभाग

### शिष्टमंडळ घेणार आंदोलकांचे भेट

जनआक्रोश मोर्चातील आंदोलकांचे एक शिष्टमंडल आज मुख्यमंत्र्यांच्या भेटीला जाणार आहे. त्या ठिकाणी सध्या चौकशीची काय परिस्थिती आहे, ती उघड करा अशी मागणी केली जाणार आहे. तसंच, पुढील आंदोलनाची दिशाही आज ठरवण्यात येणार आहे.



बीड । प्रतिनीधी बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणी अद्यापही एक आरोपी फरार आहे. तसंच, आतापर्यंत अटक करण्यात आलेल्या आरोपींची सखोल चौकशी झालेली नाही. या कारणांमुळे संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांनी मुंबईत जनआक्रोश मोर्चा काढला आहे. मुंबई मेट्रो सिनेमा ते आझाद मैदान असा मोर्चाचा मार्ग असून यामध्ये मराठा क्रांती मोर्चाचे सदस्यांसहित संतोष देशमुख यांचे कुटुंबीय सहभागी झाले

### आरोपीला पकडून फाशीची शिक्षा द्यावी

त्या पुढे म्हणाल्या, या बहिणीची सरकारला कळकळीची विनंती आहे. लवकरात लवकर आरोपीला पकडून फाशीची शिक्षा द्यावी. जर माझ्या लहान भावालाही काहीतरी झालं तर कुटुंब कसं चालणार? माझे आई वडील म्हातारे आहेत. मीही आजारी असते. माझं रक्त कमी आहे, व्हिटॅमिन कमी आहेत. पण चिमुकले मोर्चात फिरायला लागले, म्हणून मी आले.

### त्याने आम्हाला आनंदी जगायला शिकवलं

पाच महिन्यांपूर्वी एकदा भाऊ पुण्याला आला होता. आम्ही हॉटेलमध्ये जेवायला गेलो होतो.माझ्या आजारपणाबद्दल मी त्याला म्हणाले तेव्हा त्याने मला बाहेर रस्त्यावर राहणारे लोकलही कसेआनंदी राहतात हे दाखवलं. तो राजा होता आणि देवमाणूस होता. तो आनंदी कसं राहायचं हे शिकवतहोता. त्याच्या एका वाक्यानेच मी झोपेतून उठायचे. त्यामुळे त्याच्या मुलांकडे पाहून तरी सरकारने आरोपीला पकडावं. त्या मुलांचं खूप वाईट वाटतंय, अशी भावनिक प्रतिक्रियाही त्यांनी दिली. यावेळी त्यांना अश्रू अनावर झाले



आज राष्ट्रवादी कॉँग्रेसचे नेते व राज्याचे क्रीडा, युवक व अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभागाचे मंत्री आदरणीय ना.दत्तात्रयजी(मामा) भरणे यांचे प्रजासत्ताक दिनानिमित्त शहरात आगमन झाले असता त्यांचे स्वागत करताना माजी आमदार संजय भाऊ दौंड, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, बबनराव गवते बाप्पू

बीड : राज्याचे क्रीडा मंत्री ना.दत्ता भरणे हे प्रजासत्ताक दिनानिमित्त शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमासाठी आले आहेत. बीडमध्ये राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी माजी आमदार संजय दौंड, राष्ट्रवादी लीगल सेलचे जिल्हाध्यक्ष ॲड..नागेश तांबारे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



# खासदार बजरंगबप्पाचे कागद बोलू लागले

## देशमुख हत्या प्रकरणी दिल्लीचे आदेश मुंबईत





संतोष देशमुख हत्या समोर आल्या नंतर पहिल्या तासापासून ते आजतागायत खा.बजरंग सोनवणे यांनी थेट केंद्रीय गृहमंत्रालय, मानव अधिकार आयोग, केंद्रीय दक्षता आयोग आणि राष्ट्रीय तपास यंत्रणा पर्यंत लेखी तक्रारी केल्या. स्व. संतोष देशमुखांची निर्घृण हत्या व बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचे विदारक चित्र संसद सभागृहात व विविध केंद्रीय यंत्रणांना विषद केले ज्यातून आता मुंबईसोबत पत्रव्यवहार सुरु झाला आहे . रस्त्यावर आक्रोश सुरु असताना विविध सभेतून आवाज उठवणारे खासदार प्रशासकीय स्तरावर देखील लढत असल्याचे परिणाम समोर येत आहेत .संतोष देशमुख प्रकरणी तपासकारणी सदरील प्रकरणी मानवी अधिकारांचे दमन झालेले आहे करिता तपास स्थितीची वस्तुनिष्ठ माहिती दिल्ली कडे मागवली आहे. भारत सरकार समोर खून प्रकरणातील वस्तुस्थितीची प्रभावीपणे मांडणी करून नियोजनबद्ध रीतीने विविध यंत्रणांकडे पाठपुरावा करुन अवघ्या देशाचे लक्ष वेधणारे खासदार या प्रकरणी लढवय्ये म्हणून समोर आलेले आहेत. कार्यवाही काय केली अशी विचारणा करणारे खलिते दिल्लीवरून मुंबईत दाखल झाल्याने यंत्रणा पुन्हा दक्ष झाल्याचे चित्र आह




बीड पंचायत समितीच्या परिसराची स्वच्छता करतात गट विकास अधिकारी श्री वानखेडे प्रविणकुमार व कर्मचारी

# बीड नाट्य परिषदेची एकांकिका विच्छेदन अंतिम फेरीत दाखल



बीड-प्रतिनिधी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा बीडची एकांकिका विच्छेदन शाखा अंतर्गत एकांकिका स्पर्धेत उत्कृष्ट ठरली असून दिग्दर्शन व अभिनयाच्या पारितोषिकासह तीन पारितोषिके मिळाले आहेत तर मुंबई येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात ३१ जानेवारी रोजी होणाऱ्या अंतिम फेरीत तिचा प्रयोग होणार आहे. सोलापूर येथे नुकत्याच पार पडलेल्या प्राथमिक फेरीत बीड शाखेची विजयकुमार राख लिखित - दिग्दर्शित एकांकिका विच्छेदन उत्कृष्ट ठरली आहे शिवाय अभिनयाचे गुणवत्ता प्रमाणपत्र अभिषेक इनकर यास मिळाले तर उत्कृष्ट दिग्दर्शनाचे पारितोषिक विजयकुमार राख यांना मिळाले आहे. विच्छेदन एकांकिकेत अभिषेक इनकर, मनोज जाधव, निकिता काशीद, कृष्णा टिपाले, शिवराज झांबरे, अमन तांगडे, शरद भांगरे, सुरज उफाडे,आकांक्षा डंबाळे आदींनी भूमिका केल्या आहेत तर महेश जगताप, सागर धनवे, राहुल पांडव, अशोक घोलप आदींनी तांत्रिक बाजू सांभाळल्या. दिनांक ३१ जानेवारी रोजी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात महाराष्ट्रातील निवडक ६ एकांकिकेची अंतिम फेरी होणार असून अनेक दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत या एकांकिकेचे सादरीकरण होणार आहे. अंतिम फेरीसाठी बीड नाट्य परिषदेच्या अध्यक्ष तथा कार्यकारणी सदस्य प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर , नियमक मंडळ सदस्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, डॉ. दुष्यंत रामटेके, विजयकुमार राव यांच्यासह नाट्य परिषदेचे सर्व सदस्यांनी अभिनंदन केले आहे.

# पोलिसांच्या अंगात जनरल डायर शिरला का; महिलेस नेकनूर पोलिसांकडून लघुशंका होईपर्यत मारहाण!





## पीडितेची आपबिती

शुक्रवारी सायंकाळी बिभीषण नामक व्यक्ती घरात घुसला, सततच तो असे करुन कोणतीही वस्तू उचलून घेऊन जातो, यामुळे मी त्यास धरून नेकनूर पोलीस ठाण्यात घेऊन गेले. यावेळी मी त्या व्यक्तीला शिवीगाळ करीत असल्याने दोन पोलिसांनी गप्प बस म्हणून काठीने मारहाण केली. मला लहंग्यात लघवी झाल्याचे सांगितले तरी मारहाण केली. यानंतर आज सकाळी बीड येथे उपचारासाठी सरकारी दवाखान्यात आले तरी उपचार करण्यात आले नसून चालढकल करीत आहेत असा आरोप केला

बीड । बीड पोलिसांचे लक्तरे आधीच वेशीला टांगलेले असताना नेकनूर पोलिसांनी तर अजबच केले आहे. एका महिलेस पुरुष पोलीस कर्मचाऱ्यांनी बेदम मारहाण करून मानवतेला काळिमा फासला आहे . त्यामुळे बीडची खाकी बदनाम होत आहे. एसपी साहेब अशा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर नियंत्रण आणणे तुमचे काम आहे. एखाद्या महिलेवर इतका अमानुष अत्याचार होत असेल तर सर्वसामान्यांनी जायचे कोठे असा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, एक गरीब असलेल्या घिसाडी समाजाच्या महिलेला नेकनूर येथीलच बिबीशन शिंदे या नराधमाने घरामध्ये घुसून गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्याने सदरील महिलेवर अतिप्रसंग करण्याचाही प्रयत्न केला. त्यानंतर सदरील महिला जेव्हा नेकनूर ठाण्यात २४ तारखेस गेली तेव्हा तिला आडोशी घेऊन पुरुष पोलीस कर्मचारी यांनी मारहाण केली. त्या अन्याया विरोधात सदरील महिलेने लेखी स्वरूपात तक्रार केली असून, यावर कार्यवाही होण्याची मागणी केली आहे. याबाबत महिलेने मीडियासमोर येऊन आपले म्हणणे स्पष्टपणे मांडले आहे. एखाद्या महिलेवर एखादा नराधाम खुलेआम अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करीत असेल तर हे गंभीर आहे. याहीपेक्षा गंभीर म्हणजे पोलीस या महिलेची तक्रार घेऊन आरोपीवर गुन्हा दाखल करीत नसतील आणि उलट महिलेलाच दमदाटी करून तिला मारहाण करीत असतील तर त्या परिसरातील कायदा सुव्यवस्था किती खालच्या स्तराला गेली आहे हे स्पष्ट होत आहे. महिलेची तक्रार आली तर ती अगोदर नोंदवून घेतली पाहिजे, तिची चौकशी केली पाहिजे

## पोलीस अधीक्षक यांना विचारू : खा.सोनवणे

सदरील प्रकरणी ताईकडून माझ्याकडे लेखी निवेदन मला मिळाले आहे. या प्रकरणी जाब विचारून कार्यवाही करायला भाग पाडू असे
- बजरंग सोनवणे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार २६ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



# संपादकीय

## सारे जहाँ से अच्छा

प्रशांत विजया अनंत दैठणकर
जिल्हा माहिती अधिकारी बीड
मो.९८२३१९९४६६

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जगातील कोणतीही आर्थिक ओळख नाही अशा स्थितीत असणारा आपला देश आता जगातली पाचवी अर्थसत्ता बनला आहे आणि याच पार्श्वभूमीवर आपण २६ जानेवारीला ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करणार आहोत या निमित्ताने देशाच्या विकासाची वाटचाल आणि त्याला असलेले संविधानाचे अधिष्ठान अधिक प्रभावीपणे कार्यरत असल्याचे जाणवते. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले त्यानंतर राज्यघटना अर्थात संविधान लिहिण्याचे काम सुरू झाले. या संविधानास स्वीकार करून आपण संघराज्य हे देखील सार्वभौम प्रजासत्ताक म्हणून घोषित केले तो दिवस अर्थात २६ जानेवारी १९५० होय. प्रजासत्ताक दिन साजरा करण्याचे नेमके प्रयोजन देखील हेच आहे. आपण स्वीकार केलेल्या संविधानाच्या स्मरणाचा हा दिवस. संविधान हा प्रत्येक भारतीय व्यक्तीचे हक्क, कर्तव्य यांचा अमूल्य असा दस्तऐवज आहे आणि याद्वारेच लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांची प्रतिष्ठापना झालेली आहे. आपले संविधान डोळ्यासमोर येते ते भारतीय लोकांच्या आकांक्षा आणि स्वप्ने यांना आधार देणारे अधिष्ठान म्हणून याचे असलेले महत्त्व अधोरेखित होते. आपल्या स्वातंत्र्यासाठी मोठा लढा उभारण्यात आला होता आणि यात अनेकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिलेले आहे. या सर्व स्वातंत्र्यसैनिक हुतात्म्यांसह या स्वातंत्र्यलढ्यातील प्रत्येक स्वातंत्र्यसैनिकाचे स्मरण करण्याचा हा दिवस त्यानंतर आधुनिक भारताच्या उभारणीत सीमेवर युद्ध लढून देशाच्या संरक्षणासाठी शहीद झालेला जवानांचेही स्मरण करण्याचा हा दिवस आहे. संविधानात प्रतिष्ठापित मूल्ये आणि तत्वे यांचे पालन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. ती मान्य करून प्रगत आणि समृद्ध भारताची उभारणी करण्यासाठी वचनबद्ध होण्याचा हा दिवस म्हणजे प्रजासत्ताक दिन आहे. गेल्या ७६ वर्षात सर्व क्षेत्रात आपला देश अग्रेसर राहिलेला आहे. मंगळ आणि चंद्रावरच्या मोहिमेत यश मिळवताना दुसरीकडे अन्न धान्य उत्पादनात आलेली आत्मनिर्भरता औद्योगिक क्रांतीतून साधलेली प्रगती हे सारं आपण या दिवशी आठवलं पाहिजे. जागतिक क्षेत्रात गुंतवणूकदार उत्तम संधीचा देश म्हणून आपल्याकडे बघतात त्यामुळे आपल्या देशावर १५० वर्षे राज्य करणाऱ्या ब्रिटनला मागे टाकून पहिल्या पाच आर्थिक सत्तांमध्ये आपण प्रवेश केला आहे. दळणवळण क्रांतीत आपण ५ ऋचा टप्पा ओलांडून ६ ऋ तंत्राच्या उंबरठ्यावर आहोत आणि सोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात -ख मध्येही आपण वाटचाल सुरू केली आहे. आगामी काळ हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा काळ आहे याच जाणिवेतून आपण पावलं उचलायला हवी. चांद्रयान प्रक्षेपण बघण्यासाठी बैलगाडीतून जाणारा हा आपला भारत देश आजही जमिनीवर आहे आणि अवकाशालाही गवसणी घालतोय म्हणून आपला हा देश खऱ्या अर्थाने सारे जहाँ से अच्छा ठरतो.




वाईट बघू नका, वाईट चिंतू नका, वाईट बोलू नका असे कितीही घसा फोडून सांगितले तरी अनेकवेळा तसेच वागण्याचा मनुष्यस्वभाव आहे. अशा स्वभावामुळे त्या व्यक्तीचे नुकसान तर होतेच शिवाय तो अनेकांच्या नुकसानाला कारणीभूत ठरतो. याचे प्रत्यंतर मध्य रेल्वेच्या भुसावळ- मुंबई मार्गावर जळगाव जिल्ह्यातील माहेजी ते परधाडे स्थानकादरम्यान आले. या स्थानकांदरम्यान लखनौ-मुंबई पुष्पक एक्स्प्रेसच्या एका डब्यात आग लागल्याची अफवा पसरल्याने घाबरून प्रवाशांनी साखळी ओढत गाडी थांबवून उड्या मारल्या. त्याचवेळी भुसावळकडे जाणा-या कर्नाटक एक्स्प्रेसखाली अनेक प्रवासी चिरडले गेले. त्यापैकी १२ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला तर ४० हून अधिक जखमी झाले. पुष्पक एक्स्प्रेस बुधवारी दुपारी पावणेचारच्या सुमारास भुसावळहून मुंबईकडे रवाना झाली. पाचोरा तालुक्यातील माहेजी-परधाडे स्थानकादरम्यान गाडी आली असता पावणेपाचच्या सुमारास इंजिनलगतच्या द्वितीय श्रेणीतील डब्यात आग लागल्याची अफवा पसरली. त्यामुळे घाबरलेल्या प्रवाशांनी गाडी थांबवली आणि डब्यातून उड्या मारल्या. त्याचवेळी बंगळुरूहून दिल्लीकडे जाणा-या कर्नाटक एक्स्प्रेसने रुळावर उभ्या असलेल्या प्रवाशांना धडक दिली. आपत्कालीन साखळी ओढली गेल्याने चालकाने ब्रेक लावले. ब्रेक लावल्याने चाके रुळावर घासली जाऊन ठिणग्या उडाल्या. गाडीतील प्रवाशांनी ते पाहिले आणि आग लागल्याची अफवा पसरली. काही घाबरलेल्या प्रवाशांनी गाडीतून दोन्ही बाजूंनी रेल्वे ट्रॅकवर उड्या मारल्या. त्याचवेळी बंगळुरूहून येणा-या कर्नाटक एक्स्प्रेसखाली हे प्रवासी चिरडले गेले. अपघातानंतर रेल्वे ट्रॅकवर सर्वत्र मृतदेह व मानवी शरीराचे तुटलेले अवयव दिसून येत होते. पुष्पक एक्स्प्रेस थांबल्यानंतर साखळी का ओढली याची तपासणी सुरू होती. यावेळी काही प्रवासी गाडीतून उतरत होते. तपासणी

## अफवेचे बळी

होत असताना चालकाने नियमानुसार फ्लॅशर लाईट ऑन केला होता. दुस-या बाजूने येणा- या कर्नाटक एक्स्प्रेसच्या चालकाने तो लाईट पाहिला होता आणि त्याने ब्रेक लावून गाडी थांबवण्याचा प्रयत्न केला होता असे सांगितले जाते. घटनास्थळावर वळण असल्याने दृश्यता आणि ब्रेकिंगसाठीचे अंतर कमी होते. दोन्ही चालकांनी अपघात रोखण्याचा आटोकाट प्रयत्न केल्याचे सांगण्यात आले परंतु दुर्दैवी घटना घडलीच. रेल्वेच्या एकाच डब्यातील लोकांनी उड्या मारल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. कानावर पडलेल्या शब्दांची खात्री न करता प्रवाशांनी जीव वाचवण्यासाठी घाईघाईने रेल्वेतून उड्या मारल्या आणि नाहक जीव गमावला. एका अफवेने घात केला आणि क्षणात होत्याचे नव्हते झाले. कर्नाटक एक्स्प्रेसने रुळावर प्रवासी दिसत असतानाही हॉर्न वाजवला नाही असे काहींचे म्हणणे आहे. हॉर्न वाजवला असता तर रुळावर थांबलेले प्रवासी सावध होऊन वाचले असते असेही म्हटले जाते. परंतु या जर-तरच्या गोष्टी झाल्या. रेल्वे दुर्घटनेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोक व्यक्त केला आहे आणि मृतांच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. जखमींवर शासनाच्या वतीने मोफत उपचार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आधीच रेल्वे रुळावरून घसरणे, दोन गाड्यांची चुकीने समोरासमोर टक्कर होणे, गाडीच्या एखाद्या डब्याला आग लागणे यासारख्या घटना घडून अनेकांचे प्राण गेले आहेत. त्यात आता गाडीच्या डब्याखाली आग लागल्याची अफवा पसरून मोठी दुर्घटना घडावी हे दुर्दैवीच. वाईट याचे वाटते की, कोणतीही शहानिशा न करता, स्वत:चा जीव वाचवण्यासाठी अनेकांनी डोळे झाकून रेल्वे ट्रॅकवर उड्या मारल्या. शेवटी जे व्हायचे तेच झाले. कर्नाटक एक्स्प्रेसच्या चालकाने भोंगा वाजवला असता तर अनेकांचे प्राण वाचले असते असे म्हटले जाते परंतु या जर-तर च्या गोष्टी झाल्या. आता रेल्वे व राज्य सरकारतर्फे मृतांच्या कुटुंबियांना कितीही आर्थिक मदत जाहीर केली तरी गेलेले प्राण परत येणार नाहीत. यातून धडा काय तर, जनतेने कोणत्याही गोष्टीची शहानिशा न करता चुकीचे निर्णय घेणे म्हणजे स्वतःहून संकटास आमंत्रण देण्यासारखे आहे. आगीच्या खोट्या अफवेने भीतीपोटी सुरक्षित राहण्याऐवजी जीव द्यावा लागला ही दुःखदायक घटना आहे. देशात सर्वाधिक केला जाणारा रेल्वेप्रवास असा धोकादायक ठरावा याचे वाईट वाटते. कुठलीही रेल्वे, विशेषतः लांब पल्ल्याची रेल्वे थांबली की त्यातील प्रवासी अस्वस्थ होतात, त्यातच आगीची अफवा पसरली की जीव वाचवण्यासाठी प्रवासी रेल्वेतून खाली उतरतात. त्यामुळे अशा प्रकारे रेल्वे थांबली की ती का थांबली ते प्रवाशांना कळावे म्हणून डब्यामध्ये स्पीकर यंत्रणा असावी. ज्यामुळे प्रवाशांना माहिती दिली जाऊ शकेल. लोकल ट्रेनमध्ये अशी व्यवस्था असते. एकूणच प्रवास कुठलाही असो प्रवाशांनी सावध व सतर्क राहणे अत्यावश्यक झाले आहे. एखादी अफवा लोकांचे कसे हकनाक बळी घेते ते जळगाव जवळच्या रेल्वे अपघातात दिसून आले. चुकीची किंवा अर्धवट माहिती किती भयंकररीत्या किंमत मोजायला लावते हेही या घटनेवरून सिद्ध झाले. या निमित्ताने प्रवासादरम्यान घ्यायची काळजी किंवा एखाद्या आणीबाणीप्रसंगी नेमकी काय कृती केली पाहिजे याची देखील जनजागृती करण्याची वेळ आली आहे. प्रवास लांबचा असो की जवळचा तो सुरक्षितपणेच झाला पाहिजे. ही सुरक्षितता तितक्याच सावधपणे बाळगण्याचे काम प्रवाशांना करावे लागेल. तरच अशा प्रकारच्या दुर्घटना टाळता येऊ शकतील. गत पाच वर्षांपासून रेल्वेने आपल्या आधुनिकीकरणाला सुरुवात केली आहे. तेजस एक्स्प्रेस, वंदे भारत, नवीन राजधानी यासारख्या ब-याच आधुनिक सुविधा असलेल्या गाड्या प्रवाशांच्या सेवेसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. परंतु सध्याचे तंत्रज्ञानाचे युग लक्षात घेता, रेल्वेचा जसा एक गार्ड असतो त्याप्रमाणे सुरक्षिततेसाठी संरक्षक पथक तैनात करण्याची गरज आहे. तेजस किंवा वंदे भारत या गाड्यांचे भाडे सामान्य गाड्यांपेक्षा दुप्पट असते. सर्वसामान्याला ते परवडणारे नाही. या नव्या गाड्यांमध्ये प्रत्येक डब्यात सूचना देता येईल अशी ध्वनी यंत्रणा बसवण्यात आली आहे. तशी यंत्रणा आता सर्वच गाड्यांमध्ये बसवली गेली पाहिजे. सध्याचा जमाना आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा आहे. सीसीटीव्ही आणि अन्य माध्यमातून गाडी कुठल्या मार्गाने जात आहे, समोरून कोणती ट्रेन येणार आहे हे छोट्या स्क्रीनवरून दाखवता येऊ शकते. गाडीच्या कोणत्या भागात तांत्रिक बिघाड झाला आहे हे सुद्धा प्रवाशांना सविस्तरपणे सांगता येऊ शकते. परंतु सामान्य माणसाला परवडणा-या पॅसेंजर अथवा एक्स्प्रेस गाड्यांमध्ये अशा प्रकारची कोणतीही सुविधा नाही. अशा असुविधांमुळेच सर्वसामान्यांचे मरण स्वस्त ठरते. रस्ते अपघात असो, रेल्वे अपघात असो, उत्सव-यात्रा यामध्ये होणारी चेंगराचेंगरी असो त्यात सर्वसामान्यांचेच बळी जातात. म्हणून म्हणायचे- मरण स्वस्त

## दुर्दैवी रेल्वे अपघात

बीड जिल्हा हा राज्यातला ख-या संघर्ष शिकविणारा, मेहनत शिकविणारा जिल्हा होता. तीच बीडची ओळख होती. अध्यात्मिक संप्रदायात विविध संतांच्या विचारांनी पुनीत झालेला जिल्हा अशीच बीडची ओळख होती. मात्र मागच्या काही काळात विकासाच्या संकल्पनेवर सारे चेहरे रंगविले जाऊ लागले आणि बीड जिल्हा म्हणजे मागास जिल्हा, ऊसतोड कामगार पुरविणारा जिल्हा अशी ओळख बिडकर म्हणून आम्ही आणि आमचे लोकप्रतिनिधीच मिरवू लागले. ऊसतोड कामगार पुरविणारा जिल्हा हे बीडचे एक अंग आहे, नाही असे नाही, मात्र केवळ तीच बीडची ओळख नव्हती. आता तर मागच्या एक दिड महिन्यापासून बीडची ओळख बाहेर सांगू नये असे वातावरण राज्यात निर्माण झाले आहे. संतोष देशमुख यांची झालेली हत्या नक्कीच नृशंस म्हणावी अशीच आहे, आणि त्याचा निषेध झालाच पाहिजे, पण केवळ तीच बीडची ओळख नाही. या हत्याकांडानंतर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनीही बीडमध्ये अराजक सुरु असल्याचे सांगितले. बीडमध्ये कायदा सुव्यवस्थेच्या संदर्भाने काही प्रश्न निश्चितच आहेत, त्याची प्रभावी सोडवणूक झालीच पाहिजे, मात्र त्यासाठी केवळ बीड फार वाईट आहे म्हणून भागणार नाही. आजच्या घडीला बीडच्या लोकांना बाहेर कोणी खोलीही द्यायला तयार नाही अशी परिस्थिती या सा-या गोष्टींमुळे निर्माण झाली आहे. बीडमध्ये वाळू माफिया आहेत असे सांगून मुख्यमंत्री मोकळे झाले, मात्र आता त्यांचेच राधाकृष्ण विखेंसारखे मंत्री वाळूच्या गाड्यांबद्दल मचालू द्या, ते आपलेच आहेतफ असे जाहीरपणे बोलत असतील तर एकटे बीडचा राज्यात वेगळे आहे असे कसे म्हणता येईल ? एक बिडकर म्हणून आता आपला कोणता चेहरा प्रकर्षाने समोर आणायचा याचा विचार आपल्याला करावा लागणार आहे.मागच्या महिनाभरापासून राज्याच्या वेगवेगळ्या भागातील लोक बीड बद्दल केवळ आणि केवळ वाईट तेच काय ते जगासमोर सांगत आहेत. ज्यांना बीडकरांच्या वेदनांशी फार काही देणेघेणे असते हे कधी जाणवले नाही, बीड जिल्ह्यात दुष्काळ असताना राज्याच्या इतर भागांमधून कधी इकडे मदतीचा ओघ वाहू द्यावा यासाठी ज्यांनी कधी प्रयत्न केले नाहीत, बीड जिल्ह्याला हक्काचे पाणी मिळावे यासाठी कधी ज्यांची जीभ उचलली नाही अशा अंजली दमानिया, तृप्ती देसाई यांना बीडची वाईट बाजू सांगताना मात्र किती बोलू आणि किती नको असे होते, हे सा-या राज्याने अनुभवले आहेच. त्यांचे ठीक आहे, त्यांना बीडचे चांगुलपण कदाचित पाहायचेच नाही, कारण त्यासाठी त्यांना कोणी माध्यमांमध्ये चर्चेला बोलावणार नाही, पण बीडकर म्हणून आपल्याला काही गोष्टींचा विसर पडून कसे चालेल? खोखोच्याविश्वचषकामध्ये देशाला विजेतेपद मिळाले, या संघाची कर्णधार असलेली प्रतीक्षा इंगळे बीड जिल्ह्यातील आहे, देशपातळीवर बीडचं नाव झळकविणारा अविनाश साबळे देखील बीड जिल्ह्यातीलच. ही बीडची ओळख होत नाही का? देशपातळीवर प्रजासत्ताक दिनाच्या परेडला फार महत्व असते, त्यासाठी बीड जिल्ह्याच्या देवडीची कन्या असलेल्या दामिनी देशमुखची निवड झाली, राष्ट्रीय पातळीवरील शूटिंग स्पर्धेत व्यवसायाने अभियंता असलेल्या संध्या फरताडे यांनी यश मिळविले, त्या देखील बीडच्याच. मागच्या अवघ्या काही दिवसातील या घटना, बाकी इतिहासात जाऊन सांगायचे तर अनेक गोष्टी आहेतच. नुकतंच साखर उद्योगातील मानाचा मानला जाणारा वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचा व्यवस्थापनामधील दुसरा पुरस्कार माजलगावच्या छत्रपती साखर कारखान्याला मिळाला, मल्टीस्टेट मध्ये अनेक गोष्टी घडत असतानाही मंगलनाथ परिवार, किंवा तुळजाभवानी परिवाराने आपले एक नाव टिकविले आहे, ते देखील बीडचेच, रेशीम उद्योगात नेकनुरसारख्या ठिकाणी समृद्धी सरिकल्चरच्या माध्यमातून काम करणारे थोरात दाम्पत्य बीडचेच. बाकी शेती क्षेत्रातील वेगवेगळे प्रयोग करणारे असतील, सामाजिक क्षेत्रात काम करणारे संतोष गर्जे, दीपक नागरगोजे, दत्ता बारगजे हे चेहरे बीडचेच. शिवजयंती उत्सवाच्या माध्यमातून सामूहिक विवाहाची चळवळ राबविलेले बाळू ताकट हे बीडचेच, मानवलोक संस्था देखील बीडचीच इतर कोणी बोलतील का नाही माहित नाही, मात्र बीडकरांनी तरी आपल्या जिल्ह्याची खरी ओळख ही आहे हे आता सांगायला हवे, चर्चा याच्या व्हायला हव्यात.मागच्या एक दिड महिन्यापासून जिल्ह्याची चर्चा होतेय ती केवळ वाईट अंगानेच, बीड म्हणजे दहशतीचे केंद्र असे काहीसे चित्र राज्यभरात निर्माण झाले आहे. मात्र हे सारे होत असताना बीडचे नाव अभिमानाने घ्यावे अशा काही घटनाही घडल्या. असे अभिमान वाटावे असे प्रसंग अजूनही आहेतच, त्याची चर्चा होणार कधी ? खरेतर अशांचे अभिनंदन होऊन ही बीडची ओळख म्हणून समोर यायला हवे.

# तुम्ही चिंता सोडा; बार्शी नाका रेल्वे थांबा मी मंजूर करून घेतो

## खा.बजरंग सोनवणे यांचा रेल्वे कृती समितीला बैठकीत शब्द, समितीकडून टाळ्या वाजवून स्वागत

बीडः अवघ्या काहीच दिवसात बीडला रेल्वे येत आहे. बीडपर्यंतचा रेल्वे भुसंपादनाचा विषय मार्गी लावला असून १२ मार्च २०२५ च्या संसदीय अधिवेशनासाठी बीडच्या रेल्वेने जाण्याचा माझा प्रयत्न आहे. त्यासाठी आवश्यक पाठपुरावा सुरू आहे. दरम्यान, बीडमधील बार्शी नाका इमामपुर रोड परिसरात रेल्वेला थांबा देण्याची मागणी समोर आली आहे. खासदार या नात्याने रेल्वे थांबा देण्याची जबाबदारी माझी असून तुम्ही चिंता सोडा, बार्शी नाका येथे रेल्वे थांबा मंजूर करून घेतो, असा शब्द खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे कृती समितीला दिला. यावेळी समितीने त्यांचे टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. येथील शासकिय विश्रामगृह येथे सायंकाळी ५ वाजता खा.बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत रेल्वे कृती समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीला कृती समितीचे अध्यक्ष गंमत भंडारी, माजी आ.सय्यद सलिम, मा.आ.उषा दराडे, जेष्ठ नेत्या सुशीला मोराळे, शिवसेना जिल्हाप्रमूख स्वप्नील गलधर, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, भागवत तावरे, खुर्शीद आलम, सुनील सुरवसे, बी.बी.जाधव यांची उपस्थिती होती. यावेळी समितीचे अध्यक्ष गंमत भंडारी यांनी रेल्वे थांबा कसा गरजेचा आहे, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी माजी आ.सय्यद सलिम, मा.आ.उषा दराडे, जेष्ठ नेत्या सुशीला मोराळे यांनीही आपली मते मांडली. यानंतर बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, रेल्वे हा बीडच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. मागील अनेक वर्षांपासून अनेकांनी यासाठी लढा दिला आहे. जेल भोगले आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी मला खासदार म्हणून संधी दिल्यानंतर दोनच दिवसात पहिली बैठक रेल्वेची लावली. याच बैठकीत रेल्वेचा आढावा घेत रेल्वे अधिका-यांकडून रेल्वे आणण्यासाठी कालावधी ठरवून दिला. पहिला टप्पा अंमळनेर ते विघनवाडी, विघनवाडी ते नवगण राजुरी असे दोन टप्पे पुर्ण केले. आता रेल्वे बीडला येत आहे. २६ जानेवारीपर्यंत रेल्वे बीडला आली असती मात्र, एकदोन भुसंपादनाच्या विषयात अधिका-यांनी दिरंगाई केल्याने रेल्वे आज येऊ शकली नाही. मात्र, भुसंपादनाचे विषय मार्गी लावले असून आता अवघ्या काही दिवसात रेल्वे बीडला येईल. शिवाय याच महिनाभरात बीड ते अहिल्यानंतर रेल्वे सुरू करण्याचा प्रयत्न आहे. याच बरोबर मार्चअखेर ही रेल्वे वडवणीपर्यंत धावेल. तर जून-जुलैमध्ये सिरसाळापर्यंत रेल्वे धावले आणि मार्च २०२६ पर्यंत रेल्वे परळीपर्यंत पोहचेल, असे काम करून घेण्यासाठी आपण पाठपुरावा करत आहोत. दरम्यान, बीडमध्ये पालवन भागात रेल्वे स्टेशन तयार झाले असून बार्शी नाका इमामपुर भागात रेल्वे थांबा देण्याची मागणी देखील पुढे आलेली आहे. यासाठी रेल्वे कृती समितीला सोबत घेवून आपण हे रेल्वे स्टेशन मंजूर करून घेवू, त्यासाठी आंदोलन वगैरे करायची गरज नाही. हा विषय माझी जबाबदारी आहे आणि ती जबाबदारी आपण पुर्ण करून रेल्वे स्टेशन मंजूर करून घेऊ, असा शब्द यावेळी दिला.

०० तीन कामांचा केला उल्लेख बीड रेल्वे कृती समितीसोबत चर्चा करताना खा.बजरंग सोनवणे यांनी तीन कामांचा उल्लेख केला. यात रेल्वेचे काम वेळेत करून घेणे, धारूरच्या घाटाचे कटींग- पालखी मार्गातील घाटाचे काम करून घेणे, बीडला दुसरा बायपास मंजूर करून घेणे, ही तीन कामे करून घेणे, हे या वर्षातील ध्येय असल्याचा उल्लेख त्यांनी केला.

०० धाराशीव- जालना रेल्वेसाठी करणार प्रयत्न अहिल्यानंतर परळी रेल्वेमार्गाचे काम आता मार्गी लागत असून येणा-या काळात धाराशीव-जालना या रेल्वेमार्गासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. हा मार्ग केवळ १८० किलोमिटरचा असून हा जोडला तर सर्वात मोठे काम बीडसाठी होणार आहे. हे करण्यासाठी आपण रेल्वेमंत्र्यांना लवकरच भेटत असून याची या पाच वर्षात सुरूवात जरी झाली तरी समाधान असेल, असेही खा.बजरंग सोनवणे म्हणाले.

००० गंमत भंडारी, मा.आ.दराडेंकडून कौतूक खा.बजरंग सोनवणे यांनी खासदार झाल्यापासून बीडचे अनेक विषय मांडले. इतके विषय मांडण्याची संधी त्यांना त्यांचा पक्ष देत असून ही बीडसाठी अभिमानाची गोष्ट आहे, अशा शब्दात समितीचे अध्यक्ष गंमत भंडारी यांनी कौतूक केले तर मा.आ.उषा दराडे यांनी खा.बजरंग सोनवणे यांची बीडच्या विकासाबाबत तळमळ दिसत असून ते ज्या पध्दतीने संसदेत विषय मांडत आहेत, त्याबाबत त्यांचे करावे तितके कौतूक कमी आहे, असे त्यांनी म्हटले.

०० कृती समितीसोबत केली पाहणी बार्शी नाका परिसरातील इमामपुर येथील रेल्वे थांबा हा नियोजीत होता. त्याठिकाणी सायंकाळी साडेसहा वाजता खा.बजरंग सोनवणे यांनी कृती समितीसोबत जावून जागेची आणि तेथील कामांची पाहणी केली. याठिकाणी त्यांनी परिसरातून आलेल्या नागरिकांशी संवादही साधला.

०० कृती समितीने काय





म्हटलेय निवेदनात अनेक वर्षे पर्वीच सदरील स्टेशन बार्शी नाका येथे मंजूर आहे. बार्शी नाका स्टेशनला ६० टक्के गायरान जागा उपलब्ध आहे. तसंच ज्यांच्या मालकीची जमीन जाणार आहे. त्यांना पूर्ण मावेजा दिले गेले आहे. त्यामुळे विना खर्च स्टेशन तयार मिळणार आहे. या पुर्वीच ४.२२ कोटी खर्च करुन येथे स्टेशन बांधलेले आहे. सदरील स्टेशनला रेल्वे ट्रॅक बनून तयार आहे. सदरील स्टेशनलगत हायवे नं.२२२ व २११. तसेच बायपास व बीड ते नेकनूर १०० फुट रस्ते तयार असल्यामुळे ट्रॉफीक होणार नाही. नविन व जुना मोंढा जवळ आहे. जिल्हा रुग्णालय जवळ आहे. बस स्टॅन्ड जवळ आहे. ९० टक्के शाळा, महाविद्यालय जवळ आहे. शहरातील व्यवसाय करणा-या व्यापा-यासाठी सोईचे स्टेशन आहे. शहरातील गरीब कष्ट करणा-या कामगारासाठी सोईचे स्टेशन आहे. सोलापूर-जळगाव रेल्वेमार्ग झाल्यास जंक्शनसाठी योग्य राहील. बार्शी नाका स्टेशनला चार आणे खर्च केले की स्टेशन तयार. पालवण येथे नवीन स्टेशन जागी हजारो प्लॉटधारकांना संपादीत करुन मावेजा वाटप करावा लागेल. येथील जमिनीचे भाव जास्त असून येथे काही बांधकामेही झालेली आहेत. यामुळे रेल्वेचा खर्च वाढेल व रेल्वेसाठी विलंब होऊ शकतो. सातही तालुक्यासाठी अत्यंत सोयीसकर ठरेल.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार २६ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



# ज्येष्ठ साहित्यिक, माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांचे निधन

छ.संभाजीनगर। प्रतिनिधी भारतीय राजकीय आणि वैचारिक परंपरांचा काळ चिमटीत पकडून सर्वसामान्य वाचकापर्यंत तो सोप्या पद्धतीने पोहचविण्यासाठी सातत्याने काम करणारे ज्येष्ठ साहित्यिक व माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांचे शनिवारी पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षाचे होते. देशाची राजकीय स्थिती यामध्ये हैदराबाद संस्थानातील मराठवाडा समजून घेऊन या भागाचा इतिहास, सामाजिक, राजकीय वास्तव आपल्या लेखनातून मांडणारे चपळगावकर गेल्या काही महिन्यापासून कर्करोगाशी झुंज देत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, तीन विवाहित कन्या, नातवंडे असा परिवार आहे. नरेंद्र पुरुषोत्तम चपळगावकर यांचा जन्म १९३८ चा. वडील हैदराबाद स्वातंत्र्य चळवळीतील नेते होते. स्वातंत्र्य चळवळीतील अनेक बारकावे माहीत असणाऱ्या चपळगावकरांनी राजकीय आणि वैचारिक परंपरा हेच लेखनाचे केंद्रस्थान मानले. विधि आणि मराठी या विषयातील पदवी संपादन केल्यानंतर सुरुवातीच्या काळात लातूरच्या दयानंद महाविद्यालयात त्यांनी मराठीचे प्राध्यापक म्हणून तर नंतर छत्रपती संभाजीनगर येथील माणिकचंद्र पहाडे विधि महाविद्यालयातही अध्यापनाचे काम केले. २८ वर्षे वकिली व्यावसाय केल्यानंतर १९ जानेवारी १९९० रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी त्यांची निवड झाली. मराठवाड्यातील साहित्य आणि वाङ्मयीन विश्वाला वळण देण्यात न्यायमूर्ती चपळगावकरांचा मोठा वाटा राहिला. राजहंसचा ङ्ग श्री. ग. माजगावकर स्मृती म हा वैचारिक लेखनासाठी पुरस्कार, मराठवाडा साहित्य परिषदेतर्फे जीवन गौरव पुरस्कार ,महाराष्ट्र फाऊंडेशन या संस्थेचा दिलीप चित्रे स्मृती पुरस्कार आणि अखिल भारतीय साहित्य महामंडळाचा राम शेवाळकर स्मृती पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेल्या नरेंद्र चपळगावकर हे वर्धा येथील ९६ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. आपल्या लिखाणातून भारतीय स्वातंत्र्याचा काळ आणि नेतृत्व या विषयीचे त्यांचे चिंतन प्रेरणादायी मानले जाते. कविता, कथा लिखाणाने सुरुवात करणारे नरेंद्र चपळगावकर यांनी आपले वैचारिक लिखाण कधीही दुर्बोध होणार नाही, याची काळजी घेतली. त्यांची एकूण ३६ पुस्तके प्रकाशित झाली होती. यामध्ये तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ, स्वामी रामानंद तीर्थ यांच्या वरील चिरत्रात्मक लिखाण असणारे कर्मयोगी सन्यासी, भाषाविषयक, साहित्य आणि समीक्षा या क्षेत्रातील दीपमाळ, नामदार गोखले यांच्यासह पंडित जवाहरलाल नेहरु व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या विषयीचे कमालीचे औत्सुक्य त्यांच्यामध्ये होते. त्यातून त्यांनी नेहरू आणि पटेल यांच्या कार्यकतृत्वाचा मांडलेला आढावा प्रेरणादायी होती. अनंत भालेराव आणि दै. मराठवाडा यांच्याविषयी ते भरभरुन बोलत. त्यांनी अनंत भालेराव यांच्याविषयीचे चरित्र्यात्मक लिखाण केले होते

# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाचे दि. २७जानेवारी रोजी स्नेहसंमेलनाचे आयोजन

माजलगाव -येथील भा. शि. प्र. संस्था अंबाजोगाई संचलित श्री सिद्धेश्वर म हाविद्यालयाचे संमेलनाचे उदघाटन दि २७जानेवारी सोमवार रोजी सकाळी १०वाजता होणार आहे यासाठी उदघाटक म्हणून भा. शि. प्र संस्थेचे कार्यवाह डॉ हेमंत वैद्य, प्रमुख पाहुणे प्रसिद्ध कवी संतोष नारायणकर (परभणी ) तसेच संस्थेचे मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत म ुळे, केंद्रीय सदस्य अमरनाथ खुर्पे,स्थानिक कार्यवाह ॲड.विश्वास जोशी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड यांची उपस्थिती असणार आहे.

तसेच विविध स्पर्धामधील गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण व समारोप सत्रासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलूरकर, प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ, संकुलाचे पालक व केंद्रीय सदस्य प्रकाश दुगड आणि स्थानिक व्यवस्था मंडळ अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या समारंभामध्ये आनंद नगरी, शेला पागोटे आणि विविध गुणदर्शन याचीही रेलचेल आहे. तरी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी,उपप्राचार्य डॉ.गजानन होंन्ना, डॉ. युवराज मुळये, प्रा.अंकुश सावळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. रमेश गटकळ, सहप्रमुख प्रा. प्रतिभा जाधव यांनी केले आहे.

# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित

## ई -कचरा संकलन अभियान

माजलगाव -येथील भा शि प्र संस्था अंबाजोगाई संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून अभिनव ई -कचरा संकलन अभियान राबविण्यात येत आहे.या मध्ये आपण मोबाईल, चार्जर,सीडी, टेप रेकॉर्डर,स्कॅनर,मिक्सर,ग्राइंडर, प्रिंटर इ. इलेट्रॉनिक वेस्ट देऊ शकता.अभियानाची वेळ- सकाळी १०:०० वाजता आहे.ई - यंत्रण २०२५ आपल्या शहरात होत आहे, यात पर्यावरण रक्षणासाठी शहरांमधील नागरिकांना आवाहन आहे की, जास्तीत जास्त संख्येनी ई-कचरा नजीकच्या संकलन केंद्रांवर आणून द्यावा आणि सुयोग्य कचरा व्यवस्थापनाला चालना देत पर्यावरण संवर्धनात आपला वाटा उचलावा असे आवाहन प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी, उपक्रम प्रमुख डॉ शिवशंकर मिटकरी, प्रा. रत्नदीप शिगे यांनी केले आहे.

# आत्मानुभुतीतूनच सूचनात्मक लेखन जन्मास येते - डॉ. मनोरमा गौतम

माजलगाव प्रतिनिधी दिनांक २४/०१/२०२५ श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात ऑनलाईन नवलेखक कार्यशाळा संपन्न : आत्मानुभूतीतूनच सृजनात्मक लेखन जन्मास येते असे प्रतिपादन गार्गी म हाविद्यालय, दिल्ली येथील ज्येष्ठ प्राध्यापिका मनोरमा गौतम यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय म ाजलगाव जि. बीड , जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला व विज्ञान वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढी , श्री एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, कला महाविद्यालय बिडकीन , श्री. आसारामजी भांडवलदार महाविद्यालय देवगाव रंगारी जि. छत्रपती संभाजीनगर , कालिका देवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर कासार जि. बीड , बलभीम महाविद्यालय बीड , सरस्वती महाविद्यालय केज , महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा , कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पाटोदा आय क्यू .ए .सी भाषा यांच्या संयुक्त विद्यमाने नवलेखक कार्यशाळेचे आयोजन दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता आभासी पटलावर आयोजित करण्यात आली होती . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संतोष यशवंतकर यांनी केले. या कार्यक्रमाला प्रमुख उद्घाटक म्हणून डॉ.मनोरमा गौतम, गार्गी महाविद्यालय दिल्ली विद्यापीठ ह्या लाभल्या होत्या. त्यांनी आपल्या उद्धाटनपर मार्गदर्शन करताना नवलेखक कसा असावा व सध्या इंटरनेटच्या युगामध्ये लोक साहित्य पासून दूर गेल्यामुळे लोक आत्महत्या करण्यास कसे प्रवृत्त होतात हे टाळण्यासाठी साहित्याचे वाचन करणे, त्याचबरोबर कविता त्यामधील वासल्य, प्रेम ,भक्ती यांची अनेक उदाहरणे देऊन अभ्यास पूर्ण विवेचन केले. त्याचबरोबर त्यांनी आपल्या कवितेने सर्वांना मंत्रमुग्ध करून टाकले. तदनंतर कार्यक्रम ाचे प्रमुख मार्गदर्शक स्वा. सावरकर महाविद्यालय बीड येथील डॉ. सोपान सुरवसे यांनी नवलेखक कार्यशाळेमध्ये साहित्य हा समाजाचा आरसा असून समाजाची संस्कृती, सामाजिक ,भौगोलिक ,आर्थिक परिस्थिती यावर लेखक साहित्याची निर्मिती करत असतो. आणि याचाच परिणाम समाजावर पडत असतो. त्याचबरोबर साहित्यामध्ये ब्लॉक लेखन, युट्युब त्याचबरोबर भाषेची कौशल्य याच्यावरती दीर्घ प्रबोधन केले तदनंतर डॉ. रमेश लांडगे कालिकादेवी महाविद्यालय शिरूर कासार यांनी साहित्यातील अनेक छोटे छोटे बारकावे टिपून आत्मकथन लेखन कसे करावे हे दाखले देत अभ्यासपूर्ण विवेचन केले . कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ . सदाशिव सरकटे प्राचार्य, मराठी विभागप्रमुख कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढी यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपामधे साहित्य समाज आणि त्याच बरोबर साहित्य निर्मितीसाठी नवनवीन उन्मेशशाली प्रज्ञाप्रतिभा या उक्तिच्या आधारे लेखकाची अभ्यासू वृत्ती, वाचन आणि लेखन यांची अत्यंत आवश्यकता आहे ते त्यांनी स्वतः च्या स्व अनुभवातून अतिशय अभ्यासपूर्ण आणि वैचारिक प्रबोधनातून विचार मांडले. कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. म नोरमा गौतम यांचा परिचय डॉ.मुखत्यार शेख कला म हाविद्यालय बिडकीन यांनी करून दिला. डॉ.सोपान सुरवसे यांचा परिचय डॉ. रिंगणे यांनी करून दिला, डॉ. रमेश लांडगे यांचा परिचय डॉ. तब्बसूम इनामदार यांनी करून दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतिशय उत्कृष्टरीत्या डॉ. अर्चना काटकर कला महाविद्यालय बिडकीन यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा. मिलिंद ठोकळे कला महाविद्यालय बीडकीन यांनी केले. याप्रसंगी कार्यक्रमासाठी अभासी पटलावर सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# पात्र नवमतदारांनी उत्साहाने मतदार यादीत नावे नोंदवावी कुलगुरू डॉ.मनोहर चासकर

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : ज्या तरुण-तरुणींनी १ जानेवारी २०२५ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण केली आहेत त्यांनी अत्यंत उत्साहाने आपली नावे मतदार यादीत नोंदवावी. तसेच आपल्या मित्रांना सुध्दा मतदार यादीत नावे नोंदविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले.स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात जिल्हा प्रशासनाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त कुलगुरू डॉ. मनोहर चासकर बोलत होते.यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी राजकुमार माने,उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसिलदार संजय वरकड, निवडणूक नायब तहसिलदार नितेशकुमार बोलोलू, नायब तहसीलदार इंद्रनील गरड यांच्यासह जिल्ह्यातील बीएलओची उपस्थिती होती.प्रारंभी कुलगुरू डॉ चासकर यांनी मतदाराची पुढील प्रतिज्ञा दिली.आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परपरांचे जतन करु आणि मुक्त निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, सम ाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा



# उपविभागीय कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : मौजे कोठारी येथील शेत सर्वे नंबर २२९ ही जमीन मूळ आदिवासी जमि नीवर बनावट लेआउट द्वारे अवैद्य प्लॉटिंग विक्री करणा-यावर फौजदारी गुन्हे दाखल करावे व मौजे कोठारी ( ची ) क्षेत्रातील कोठारी नाल्यालगत पूरबादीत शेती क्षेत्र सर्वे नंबर २१५ मधील नियमबाह्य प्लॉटिंग विक्रीची चौकशी करून लेआउट रद्द करणे बाबत उपविभागीय अधिकारी कार्यालय सम ोर सामाजिक कार्यकर्ते फुलाजी श्रीराम गरड यांनी २५ जानेवारी रोजी सायंकाळी ०४ वाजताच्या सुमारास उपोषणास सुरुवात केले.सविस्तर वृत्त असे की कोठारी( ची) परिसर हा भूखंड माफियाच्या अड्डा बनला असून येथे नाना प्रकारच्या तक्रारीचे प्लॉटिंग विक्री करण्याचा सपाटा भूमाफियाने लावला




आहे . काही भुमाफीयांनी शेत सर्वे नंबर २२९ ही मूळ आदिवासी जमिनी कलम ३६ अन्वये हस्तांतरण निर्बंध असतानाही विशेष शकल लढवून राज नगरी नावाने त्या ठिकाणी १५० प्लॉटिंगचे अवैद्य लेआउट पाडून सर्वसाधारण नागरिकांच्या माथी मारून अफाट पैसा लुटल्याचा धक्कादायक प्रकार झाला असून याच सर्वे नंबर मध्ये आज माथी मारलेल्या कोणत्याही प्लाटधारकांना त्यांच्या मोबदल्याचा प्लाटच मिळाला नसून मूळ आदिवासींच्या नावे आजही सातबारा उपलब्ध असुन नागरिकांची फसवणूक करणा-या भू माफियावर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करणे व तसेच कोठारी ( ची ) नाल्यालगत शेती क्षेत्र सर्वे नंबर २१५ पूर्व बाधित क्षेत्र असून दरवर्षी या संपूर्ण शेतांनी पुराचे अथांग पाणी असते या क्षेत्रात प्लॉटिंग लेआउट केले असून सदरील प्लॉटिंग प्रशासनाने रद्द करावी अशीही म ागणी सामाजिक कार्यकर्ते गरड यांनी केली असून दिनांक २५ जानेवारी सायंकाळी चार वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर ते उपोषणास बसले आहेत.

# एलिमेंटरी चित्रकला परीक्षेत सावरी मंत्री राज्यात पाचवी

अंबाजोगाई-प्रतिनिधी महाराष्ट्र शासनाच्या तंत्र शिक्षण विभाग व कला संचालनालय मुंबईच्या वतीने घेण्यात येणाऱ्या शासकीय ग्रेड चित्रकला (एलिमेंटरी) परीक्षेत योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित श्रीमती गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन करून यशाची परंपरा राखली आहे. या चित्रकला परीक्षेत कु. सावरी सुरेश मंत्री हिने महाराष्ट्र राज्यातून पाचवा क्रमांक मिळविला असून ए ग्रेड मध्ये २५ तर बी ग्रेड मध्ये ७१ विद्यार्थिनींनी मानांकन प्राप्त केले आहे या विद्यार्थिनींना चित्रकला शिक्षक डी.आर.बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.



विद्यार्थिनींच्या यशाबद्दल योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, पदाधिकारी जी.बी.व्यास, ॲड. जगदीश चौसाळकर, कमलाकर चौसाळकर, डॉ.शैलेष वैद्य, प्रा.भीमाशंकर शेटे, डॉ.जयश्री देशपांडे, ॲड.कल्याणी विर्धे यांच्यासह शालेय पदाधिकारी, कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# नवमतदार हे देशाचे भविष्य-जिल्हाधिकारी अविनाथ पाठक मतदार दिनानिमित्त निघाली रॅली

बीड, दि. २५:-नवयुवक आणि नवमतदार येत्या काळात देशाचे भवितव्य आहेत त्यासाठी जनजागृती महत्वाची आहे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित रॅलीला हिरवी झेंडी दाखवून त्यांनी सुरुवात केली याप्रसंगी ते बोलत होते.या कार्यक्रमास उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) शैलेश सुर्यवंशी, तहसीलदार




चंद्रकांत शेळके,नायब तहसीलदार सुरेंद्र डोके इतर अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे म्हणाले की, देश हा महासत्ता बनू पाहतोय राष्ट्रीय मतदार दिनाच्या जनजागृतीत नवयुवकांचा असलेला सहभाग पुढील निवडणूकीत बीडचे चित्र पालटून दाखवेल.या रॅलीला जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणातून सुरुवात होऊन शिवाजी पुतळा येथुन समाज कल्याण कार्यालयाच्या प्रांगणात समारोप करण्यात आला. रॅलीच्या समारोप प्रसंगी चंपावती विद्यालयाची विद्यार्थीनी नम्रता तांबे म्हणाली की बीड जिल्हा हा आता केवळ उसतोड कामगारांचा जिल्हा राहिलेला नसून या जिल्हयाने उत्कृष्ट खेळाडू, उत्तम प्रकारचे अधिकारी निर्माण करुन बीड जिल्हयाला ख-या अर्थाने पुढे नेले असून आपली बीडकर अशी ओळख निर्माण करण्यासाठी प्रत्येक नागरिक आणि विद्यार्थ्यांनी दृष्टीकोण बदलला पाहिजे असे तीने आपल्या मनोगतात व्यक्त केले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी सन्मानचिन्ह देऊन नम्रता तांबे हिचा गौरव केला.राष्ट्रीय मतदार दिनाच्या रॅलीत विविध शाळेने उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व समारोप उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी केले

# विवेकानंद हॉस्पिटलचा ८ वा वर्धापन दिन थाटात संपन्न

परळी (प्रतिनिधी ) परळी येथील प्रसिद्ध सर्जन डॉ भरत मुंडे यांच्या विवेकानंद हॉस्पिटल चा आठवा वर्धापन दिन डॉक्टरांची जन्मभूमी असलेल्या टोकवाडी नगरीमध्ये अतिशय थाटामाटात संपन्न झाला. विवेकानंद हॉस्पिटलच्या वर्धापन दिनानिमित्त टोकवाडी येथे रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते ही स्पर्धा तीन विभागात घेण्यात आली इयत्ता आठवी ते दहावी हा एक गट पाचवी ते सातवी दुसरा गट आणि विवाहित महिलांसाठी तिसरा गट ,रांगोळी स्पर्धेचे संयोजन सौ अश्विनी केंद्रे ,सौ राधा भरत मुंडे तसेच श्री रत्नेश्वर विद्यालयाच्या अध्यापिका सौ फुंदे मॅडम सौ योगिता तुकाराम मुंडे यांनी केले ,रांगोळी स्पर्धेनंतर शुगर -बिपी तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते डॉ भरत मुंडे व त्यांचे इतर सहकारी यांच्या उपस्थितीत शुगर आणि बिपी चे तपासणी शिबिर संपन्न झाले. तिस-या सत्राम ध्ये टोकवाडी येथील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणा-या मान्यवरांना विवेकानंद हॉस्पिटलच्या वतीने टोकवाडी रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले यामध्ये शैक्षणिक, उद्योग, व्यापार, सामाजिक कार्य ,देशसेवा, राजकीय इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा टोकवाडी रत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी विशेष अतिथी म्हणून बीड जिल्हा परिषदेचे गटनेते मा अजयजी मुंडे यांची उपस्थिती लाभली होती कार्यक्रमाचे अध्यक्षपद ज्येष्ठ समाजसेवक संभाजी जनार्दन मुंडे यांनी भूषवले तर पुरस्कार सोहळ्याला आशीर्वाद देण्यासाठी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार भागवताचार्य झी टॉकीज फेम श्री ह भ प तुकाराम महाराज मुंडे शास्त्री, डॉ संतोष मुंडे उपाध्यक्ष दिव्यांग कल्याण मंत्रालय म हाराष्ट्र शासन यांची उपस्थिती लाभली होती उपस्थित मान्यवरांमध्ये , परळी नगरीचे माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी , जिल्हा परिषद सदस्य प्राचार्य मधुकर आघाव सर ,पं स. सभापती बालाजी उर्फ पिंटू मुंडे , श्री रत्नेश्वर विद्यालयाचे प्राचार्य पी टी मुंडे सर, मा. प्राचार्य एल .आर. मुंडे सर, जिरेवाडी चे सरपंच गोवर्धन कांदे, जेष्ठ कवी डॉ राजपंखे सर, कवी अरूण पवार सर,युवक नेते संजय भास्कर मुंडे, युवक नेते टी डी मुंडे, डॉ सांगळे सर, गित्ते सर, डॉ कराड सर ,निवृत्त



अध्यापक डी एल कांदे सर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार सोहळ्याचे प्रस्ताविक करताना डॉ भरत मुंडे हे गहिवरून आले आपल्या कस्टमय प्रवासातून आपण कशा पद्धतीने या पदापर्यंत आलो याचा लेखाजोखा त्यांनी आपल्या प्रस्ताविक भाषणामध्ये मांडला. टोकवाडी गावाने मला भरभरून आशीर्वाद दिले असून त्याची कृतज्ञता म्हणून मी या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले असे भावनिक उद्गार यावेळी डॉक्टरांनी काढले .आपल्या जन्मदात्या आईच्या हस्ते केक कापून विवेकानंद हॉस्पिटलचा वर्धापन दिन साजरा करून मातृभक्तीचे दर्शन यावेळी डॉक्टरांनी गावक-यांना घडवून आणले .आशीर्वाद पर मनोगत व्यक्त करताना भागवताचार्य श्री ह भ प तुकाराम महाराज मुंडे शास्त्री यांनी डॉ भरत मुंडे यांच्या कार्याचे तोंड भरून कौतुक केले. वारकरी संप्रदायातील अनेक लोकांना मी डॉक्टरांकडे पाठवतो आणि डॉक्टरांकडून उपचार घेऊन आलेला प्रत्येक रुग्ण आनंदाने डॉक्टरांचे कौतुक महाराजांजवळ करतो, असे महाराजांनी यावेळी सांगितले टोकवाडी हे गाव प्रत्येक क्षेत्रामध्ये वरचे टोक गाठणारे गाव आहे असेही महाराज यावेळी म्हणाले .आध्यात्मिक, सामाजिक ,राजकीय, शैक्षणिक प्रत्येक क्षेत्राच्या वरच्या टोकावर टोकवाडीचे व्यक्तिमत्व विराजमान असल्याचे महाराजांनी सांगितले. आज टोकवाडी रत्न पुरस्कार दिल्या जात असून ज्यांना ज्यांना टोकवाडी रत्न पुरस्कार मिळाला त्यांनी टोकवाडी हे गाव बीड जिल्ह्याचे रत्न म्हणून समोर आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे असेही महाराजांनी यावेळी सांगितले. मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त करताना जिल्हा परिषद गटनेते श्री अजय मुंडे यांनी टोकवाडीकरांचे भरभरून कौतुक केले. स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांपासून ते मा ना धनंजय मुंडे,मा ना पंकजाताई मुंडे तथा आमच्या परिवारातील प्रत्येक सदस्यावर टोकवाडीकरांनी भरभरून प्रेम केले असल्याचे अजय मुंडे यांनी सांगितले. म्हणूनच टोकवाडीतील कोणताही कार्यक्रम असला तरी मी आनंदाने त्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी येतो, असेही अजय मुंडे म्हणाले . टोकवाडी करांचा आशीर्वाद सदैव मुंडे घराण्याच्या पाठीशी होता, आहे आणि भविष्यातही राहावा अशी अपेक्षा श्री अजय मुंडे यांनी व्यक्त केली .श्री अरुण पवार सरांनी सुंदर कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली अध्यक्षीय भाषणात समाजसेवक संभाजी मुंडे यांनी पुरस्कार प्राप्त टोकवाडी रत्नांचे कार्य उपस्थितांसमोर आणले. टोकवाडी रत्न पुरस्काराचे सर्वच मानकरी आपापल्या क्षेत्रामध्ये अग्रेसर असल्याचे अध्यक्ष भाषणात संभाजी मुंडे यांनी सांगितले, आभार प्रदर्शन समाजसेवक संतोष नाथराव मुंडे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साईनाथ विद्यालयाचे अध्यापक श्री ज्ञानोबा उत्तमराव मुंडे सर यांनी अप्रतिम रित्या केले. पुरस्कार वितरण श्री ह भ प तुकाराम महाराज मुंडे, श्री अजय मुंडे, संपादक श्री बालासाहेब फड, प्राचार्य पी टी मुंडे सर व इतर मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले,

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २६ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



# एसटीच्या भाडेवाढीमुळे प्रवासी आणि वाहकात भांडणे,



एसटी महामंडळाने शनिवार मध्यरात्रीपासून १५ टक्के भाडेवाढ जाहीर केली आहे. त्यामुळे खेडोपाड्यातील सर्वसामान्य जनतेचा प्रवास महागला आहे. एसटीची भाडेवाढ करताना ती पाचच्या पटीत करायला हवी होती. परंतूही भाडेवाढ विषम प्रमाणात झाल्याने आता ग्रामीण भागातील जनतेला तिकीट काढताना सुट्टे पैसे देताना अडचण होत आहे. नवीन भाडेवाढ करताना ती सम प्रमाणात न झाल्याने सुट्टे पैसे जर प्रवाशांकडे नसतील तर कंडक्टर आणि प्रवाशांत वाद होत आहेत. त्यामुळे ही भाडे वाढ एसटी प्रवासी आणि कंडक्टर यांच्यात वाद करणारी ठरली आहे.

एसटी महामंडळाने शनिवार मध्यरात्रीपासून १५ टक्के भाडेवाढ जाहीर केली आहे. त्यामुळे खेडोपाड्यातील सर्वसामान्य जनतेचा प्रवास महागला आहे. एसटीची भाडेवाढ करताना ती पाचच्या पटीत करायला हवी होती. परंतूही भाडेवाढ विषम प्रमाणात झाल्याने आता ग्रामीण भागातील जनतेला तिकीट काढताना सुट्टे पैसे देताना अडचण होत आहे. नवीन भाडेवाढ करताना ती सम प्रमाणात न झाल्याने सुट्टे पैसे जर प्रवाशांकडे नसतील तर कंडक्टर आणि प्रवाशांत वाद होत आहेत. त्यामुळे ही भाडे वाढ एसटी प्रवासी आणि कंडक्टर यांच्यात वाद करणारी ठरली आहे.

# फडणवीसांनंतर जरांगे पाटलांच्या रडावर आता भाजपचा हा बडा नेता?

## उपोषणाच्या पहिल्याच दिवशी दिला थेट इशारा



मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळावं या मागणीसाठी आज पुन्हा एकदा मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सुरू केलं आहे. त्यांच्या उपोषणाचा आज पहिला दिवस आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी मोठा लढा उभारला, त्यांच्या आंदोलनानंतर सरकारनं मराठा समाजासाठी स्वतंत्र आरक्षणाला मंजुरी दिली. मात्र आम्हाला ओबीसीमधूनच आरक्षण पाहिजे या आपल्या मागणीवर अजूनही मनोज जरांगे पाटील ठाम आहेत. त्यासाठी ते आता पुन्हा एकदा उपोषणाला बसले आहेत. दरम्यान त्यांनी आपल्या उपोषणाच्या पहिल्याच दिवशी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे.मराठ्याशिवाय या राज्यात कोणाचे पान हालत नाही, सत्ताधारी असो किंवा विरोधक असो, आमची ही हक्काची लढाई आहे, आता फडवणीस यांनी बेईमानी करू नये, आमच्या मागण्या मान्य कराव्यात. आमची वर्चस्वाची लढाई नाही, आमचे समाजासाठी प्रामाणिक काम सुरू आहे, असं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. यावेळी बोलताना त्यांनी भाजप नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना देखील इशारा दिला आहे. समाधान न व्हायला तुम्ही काय केले, फालतू बोलायचं नाही, आम्ही तुम्हाला सन्मानाने बोलतो, वाकड्यात शिरायचं नाही. तसा शहाणपणा इकडे नाही शिकवायचा, माजुरड्या सारखं बोलायचं नाही, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.दरम्यान शिंदे साहेब होते त्यावेळी आरक्षण दिले, आम्ही नाही म्हणत नाही, पण ते सहजा सहजी आम्हाला मिळालं नाही. आम्हाला लढावं लागलं. लाखोंच्या संख्येनं मराठा समाज रस्त्यावर होता. त्यामुळे आता सरसकट कुणबी प्रमाणपत्रासह आमच्या आठ –नऊ मागण्या मान्य करून टाकाव्यात असंही यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

### नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे पाटील?

सरकार भावना समजून घ्यायला तयार नाही, तुमचा राजकीय विरोध असेल किंवा मतभेद असतील, पण गरीबांशी सूड भावनेने का वागता असा सवाल यावेळी जरांगे पाटील यांनी उपस्थित केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, सग्या सोय-याची अंमलबजावणी नाही, शिंदे समितीचे कामही बंद करून टाकले ही कोणती पद्धत आहे, ही वागणूक चांगली नाही, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रमास उपस्थित रहा-एजाज, भोसकर





बीड । प्रतिनिधी । २६ जानेवारी रविवार रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्ताने दरवर्षीप्रमाणे यावेळीही एआयएमआयएम च्या बीड शहरातील मुख्य कार्यालयात बशीरगंज बीड येथे होणार्या ध्वजारोहण आजी माजी पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्ते उपस्थित रहावे. तसेच जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील पक्षाचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी तेथील स्थानिक कार्यालयात सुद्धा ध्वजारोहण करावे असे आवाहन पक्षाचे मा.जिल्हा उपाध्यक्ष तथा बीड तालुकाध्यक्ष शेख एजाज खन्ना भैय्या आणि बीड मा.शहराध्यक्ष शिवाजीराव भोसकर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे. या विषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, मुख्य कार्यालयात ध्वजारोहण करत साजरे करून प्रत्येकाच्या मनात राष्ट्रभक्तीचे स्पुलिंग पेटवितो. यावेळीही प्रजासत्ताक दिनानिमित्त सुद्धा बीड शहरातील बशीरगंज भागात असलेल्या पक्षाच्या मुख्य कार्यालयात पक्षाचे मा.जिल्हाध्यक्ष ड शेख शफिक भाऊ यांच्या शुभहस्ते दिनांक २६ जानेवारी २०२५ शुक्रवार रोजी सकाळी ९.३० वाजता ध्वजारोहण करून राष्ट्रीय ध्वजाला सलामी देण्यात येईल. याकरिता बीड शहर आणि तालुक्यातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सकाळी ९.३० वाजताच पक्षाच्या मुख्य कार्यालयात बशीरगंज बीड येथे उपस्थित राहावे. तसेच जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी तेथील स्थानिक कार्यालयात ध्वजारोहण करावे. असे आवाहन पक्षाचे मा.जिल्हा उपाध्यक्ष तथा बीड तालुकाध्यक्ष शेख एजाज खन्ना भैय्या आणि बीड मा.शहराध्यक्ष शिवाजीराव भोसकर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

# आनेगाव जि.प शाळेत हळदीकुंकू व तिळगुळ वाटपाचा कार्यक्रम

युसूफवडगांव । प्रतिनिधी केज तालुक्यातील आनेगाव येथील जि.प शाळेमध्ये मकरसंक्रातीच्या निमित्ताने महिलांसाठी हळदीकुंकू व तिळगुळ वाटप कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी महिलांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून जि.प शाळेचे मुख्याध्यापक श्री.पौळ सर, प्रमुख पाहुणे सरपंच सौ.ज्ञानेश्वरी अशोक गवळी व सर्व ग्रा पं सदस्य महिला हजर होत्याङ्ग या कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पुजन करून हळदी कुंकू या कार्यक्रमाची सुरुवात झाली यावेळी उपस्थित सर्व महिलांनी सुंदर अशी उखाणे घेतली.त्यानंतर चालता बोलता पैठणी जिंका असा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये जी महिला सलग तीन प्रश्नांची बरोबर उत्तरे देईल अशा महिलांना पैठणी साडीचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमांमध्ये महिलाशी निगडित असणारे विविध प्रश्न विचारण्यात आले तसेच महिलांचे काही मनोरंजक खेळ घेण्यात आले.यामध्ये खराट्याने डोळे बांधून फुगे फोडणे व दुसरा डोक्यावर प्लास्टिकचा ग्लास ठेवून रेस जिंकणे. दिवसभर महिलांनी या कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन खूप आनंद लुटला. या कार्यक्रमांमध्ये महिलांच्या सामान्य ज्ञानात भर पडली व भरपूर आनंदही मिळाला.महिलांनी या कार्यक्रमाला उत्कृष्ट प्रतिसाद दिला.यामध्ये गावातील सर्व तरुण व वयस्कर महिलाही सहभागी झाल्या होत्या.यामध्ये जिंकणाऱ्या भाग्यवान विजेत्या महिला सौ.जयश्री आप्पासाहेब काळे,सौ.पुजा मंगेश हंडीबाग व सौ. बबीता भारत जाधव यांना बक्षीस म्हणून शाळेच्या वतीने पैठणी साड्या देण्यात आल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयराम मांगडे सर यांनी केले.तसेच या कार्यक्रमांमध्ये सहभागी झालेल्या सर्व महिलांचे आभार नवनियुक्त ट्रेनी शिक्षिका पूनम मुकुंद इंगळे यांनी मानले

# काव्य लेखन स्पर्धा : ठाणे, मुंबई आणि उपनगरातील कवींसाठी संधी

वंदे मातरमब संघ, ठाणे आणि तेजस्वी फाऊंडेशन, ऑल इंडिया पोएट्री असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने माघी गणेशोत्सव निमित्त भक्ती काव्य लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.ठाणे, मुंबई आणि उपनगरातील कवी-कवयित्रींसाठी काव्य लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.ही स्पर्धा सर्वांसाठी विनामूल्य असून स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणा-या कवी-कवयित्रींनी आपली स्वलिखित कविता *१ फेब्रुवारी २०२५* पर्यंत संस्थेच्या allindiapoetryassociation@gmail.ला या अधिकृत ईमेल आयडीवर अथवा ९३२०४४१११६ ( व्हॉट्स अॅप) या क्रमांकावर पाठवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. काव्य क्षेत्रात आपले स्थान निर्माण करू इच्छिणा- या नवोदित आणि अनुभवी साहित्यिकांसाठी ही एक उत्तम संधी आहे.

# जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारल्याबद्दल अजित पवार यांचे राजकिशोर मोदी यांनी केले

अंबाजोगाई । प्रतिनिधी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद (पालकत्व) स्वीकारल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना अजित पवार यांना त्यांच्या मुंबई येथील कार्यालयात भेटून त्यांचे अभिनंदन केले आहे. यावेळी राजकिशोर मोदी यांच्यासमवेत कापूस पणन महासंघाचे संचालक ऍड विष्णुपंत सोळंके , अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी हे उपस्थित होते. राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना अजित पवार यांच्या मुंबई येथील कार्यालयात त्यांची राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांनी भेट घेतली. या भेटीत त्यांनी बीड जिल्ह्याचे (पालकमंत्री पद ) पालकत्व स्वीकारल्याबद्दल ना. अजित पवार यांचे बीड जिल्हा तथा अंबाजोगाई वासीयांच्या वतीने अभिनंदन केले. या भेटीदरम्यान अजित पवार व राजकिशोर मोदी यांच्यात बीड जिल्ह्यातील विविध विषयांवर चर्चा झाली. त्याचबरोबर अंबाजोगाई शहराच्या विकासासाठी आवश्यक अशा सर्व विषयावर देखील चर्चा करण्यात आली. राजकिशोर मोदी व ना. अजित पवार यांच्या भेटीदरम्यान अजित पवार यांनी राजकिशोर मोदी हे मागील अनेक वर्षापासून करत असलेल्या राजकिय, सामाजिक, शैक्षणिक ,सांस्कृतिक तसेच बँकिंग क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांचे कौतुक केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व पक्षाची ध्येयधोरणे संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बळकट करण्यासाठी प्रयत्न करावा अशा सूचना पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष या नात्याने अजित पवार यांनी राजकिशोर मोदी यांना दिल्या. राष्ट्रीय अध्यक्ष या नात्याने ना. अजित पवार यांनी दिलेल्या सर्व सूचनांचे पालन करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढीसाठी आपण सदैव प्रयत्न करू असे अभिवचन राजकिशोर मोदी यांनी ना. अजित पवार यांना याप्रसंगी दिले.

# धाकटी ब्रह्मगिरी गर्दीचा उच्चांक, सुमारे एक लाख भाविकांनी घातली प्रदक्षिणा



बीड -(प्रतिनिधी) बीड जिल्ह्यातच नव्हे तर मराठवाड्यात प्रसिद्धीस आलेल्या धाकटी ब्रह्मगिरी अर्थात श्री क्षेत्र महर्षी गौतम ऋषी संस्थान पालवण ता.जि.बीड येथे आज षट्तिला एकादशी निमित्त ब्रह्मगिरी प्रदक्षिणेसाठी सुमारे एक लाख भाविकांनी प्रदक्षिणा सोहळ्यात सहभाग घेतला.या संस्थानचे महंत भागवताचार्य श्री ह.भ.प.प.पू.गु..श्रीरंग महाराज डोंगरे यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली भाविकांच्या व्यवस्थेसाठी चोख नियोजन केले होते.पंचक्रोशीतील तरुणांनी दर्शन सुरळीत पार पाडण्यासाठी उत्तम नियोजन केले होते.ग्रामीण पोलिस ठाणे, बीडच्या पोलिस बांधवांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

आज षट्तिला एकादशी पूण्य पर्वकाळानिमित्त श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे सुप्रसिद्ध ब्रह्मगिरी प्रदक्षिणा केली जाते.मराठवाड्यातील भाविकांना दूर जाणे शक्य होत नाही.अशा भाविकांसाठी धाकटी ब्रह्मगिरी म्हणून श्री क्षेत्र गौतम ऋषी संस्थान पालवण येथे मोठ्या प्रमाणावर भाविक प्रदक्षिणा घालतात. अनेक वर्षांपासून येथे प्रदक्षिणा परंपरा आहे.आज पहाटेपासूनच मोठ्या संख्येने भाविक प्रदक्षिणेसाठी भाविकांची गर्दी होती.श्री क्षेत्र नारायण गडाचे महंत वै.श्री ह.भ.प.प.पू.गु.महादेव महाराज यांनी या तीर्थक्षेत्री सप्ताह सुरू करून ही परंपरा चालू केली होती.सध्या श्री क्षेत्र नारायण गडाचे विद्यमान महंत श्री ह.भ.प.गु.शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थानचे महंत श्री ह.भ.प.गुरुवर्य श्रीरंग महाराज डोंगरे यांनी गेल्या दहा वर्षांत या संस्थानचा खूप मोठा कायापालट केला आहे.एक भव्यदिव्य सभामंडप ,रमणीय स्थळ, परमपवित्र तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्धीस आले आहे.खूप मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केली असल्याने अतिशय रमणीयता आली आहे.दर महिन्याला वद्य एकादशी सोहळा,दर अमावास्येला कीर्तन, महाप्रसादाचे आयोजन भाविकांकडून केले जाते.

या षट्तिला एकादशी निमित्त भाविकांच्या फराळाची उत्तम व्यवस्था केली होती.

पहाटे चार ते पाच यावेळेत संस्थांनचे महंत गुरुवर्य श्रीरंग महाराज डोंगरे यांच्या शुभहस्ते विधिवत पूजा व आरती झाली आज पहाटेपासूनच भाविकांनी प्रदक्षिणा सुरू केली होती
ठिकठिकाणी भाविकांच्या स्वागताच्या कमानी तरुणांनी उभारल्या होत्या
पहाटे तीन वाजता अनेक भाविकांची दंडवती प्रदक्षिणा सुरू होती
अनेक गावाहून हजारो भाविकांच्या दिंड्या सहभागी झाल्या होत्या
रात्री दहा वाजेपर्यंत प्रदक्षिणा सुरू होती

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com